श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जानेवारी २०२५ | वर्ष – १३, अंक – ०१ | मासिक, पाने ०८ | Regn. No. - MAHMAR/2022/86035

## 'भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालया'त

# 'हातावरील शस्त्रक्रिया' प्रात्यक्षिक शिबिर



*डॉ. रघुनंदन कानविंदे यांच्यासह शिबिरात सहभागी प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी*

हात हा शरीराचा एक महत्त्वाचा, आश्चर्यकारक आणि तरीही थोडा कमी महत्त्व दिले जाणारा अवयव आहे. त्याची त्वचा एवढी संवेदनशील आहे की ती तीक्ष्ण सुई आणि मऊमुलायम लोकर, तप्त भांडे किंवा बर्फाचा तुकडा यातला फरक चटकन ओळखू शकते.



हातामध्ये २७ हाडे आणि ४३ स्नायू /tendons असतात आणि त्यांच्या साहाय्याने आपण अनेक प्रकारच्या क्रिया सहजपणे करतो. कथ्थक नर्तक हस्तमुद्रा करताना आपल्या हातांच्या पाचही बोटांच्या एकाच वेळी परस्पर विरुद्ध दिशेने ज्या मोहक मुद्रा करतो, त्यावरून हे लक्षात येईल.

यंत्रमानव अशा कौशल्यपूर्ण क्रिया/हालचाली करू शकत नाही. हाताचा पंजा जसा ६–७ इंचापर्यंत ताणता येतो, तशी बोटांची घट्ट ओंजळ केली तर त्यातील पाण्याचा थेंबही खाली पडत नाही! हाताची आणि मनगटाची शरीररचना ही तिच्या क्लिष्ट रचनेमुळे आणि कार्यामुळे अतिशय गुंतागुंतीची आहे. शस्त्रक्रियेमध्ये शल्यचिकित्सकाच्या हाताचे कौशल्य हे सगळ्यात महत्त्वाचे ठरते आणि त्यामुळे त्याला शस्त्रक्रिया करताना दुखावलेल्या किंवा रोगग्रस्त पेशी हाताळताना अतिशय काळजी आणि सुरक्षितता घेण्याविषयी शिकविले जाते. म्हणून उत्तम शल्यविशारदाच्या प्रशिक्षणात रुग्णचिकित्सेचे ज्ञान आणि योग्य तऱ्हेने केलेले शल्यक्रियेचे प्रात्यक्षिक याची जोड देणे आवश्यक ठरते.

आणि हे महत्त्वाचे तत्त्व लक्षात घेऊनच श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या 'भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालया'त दि. ४ आणि ५ जानेवारी २०२५



रोजी 'The SVJCT Hand Cadaver Winter Course' चे आयोजन करण्यात आले होते.

हाताच्या शस्त्रक्रियांविषयी अत्याधुनिक शिक्षण/ज्ञान देण्यासाठी योजलेला हा एक उल्लेखनीय उपक्रम होता. या कार्यशाळेमुळे अस्थिरोगाविषयी पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि कन्सल्टंट्स यांना कौशल्य आणि ज्ञान याविषयी एकत्रितपणे संपन्न करणारा अनुभव प्राप्त झाला. या अभ्यासक्रमाचे नेतृत्व इंग्लंडमध्ये सुमारे ३५ वर्षे प्रॅक्टिस करणारे डॉ. रघुनंदन कानविंदे, Orthopaedic & Upper Limb, Hand Srgeon, MS (Orthopaedics), FRCS, MCh (Orthopaedics) UK यांनी केले. आता ते वारंवार डेरवण येथे आठवड्याच्या अखेरीला जाऊन आपल्या कौशल्याचा लाभ तेथील रुग्णांना देत आहेत.

प्रमुख प्रशिक्षकांसोबत, डॉ. अभिजित वाहेगावकर (Director of Hand Surgery, Sahyadri Hospital, Pune), डॉ. अशोक घोडके (Professor and Unit Head, MGM Medical College, Navi Mumbai), डॉ. प्रशांत कांबळे (Consultant Hand, Wrist, and Elbow Surgeon, KEM Hospital, Mumbai), डॉ. सुनील नाडकर्णी (Consultant Spine Surgeon, BKLWRMC), डॉ. नेताजी पाटील (Consulting Radiologist and College Coordinator, BKLWRMC), डॉ. प्रशांत मूल्या (Professor of Anatomy, BKLWRMC), डॉ. ओंकार सुदामे (Assistant Professor in Orthopeadics, BKLWRMC), डॉ. अनीश पॉल (Consultant Orthopaedic Surgeon,



*भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाविषयी सादरीकरण करताना डॉ. सुवर्णा पाटील*

BKLWRMC), मिस कृपा टंडन (Occupational Therapist, TATA Hospital, Mumbai) आदी विशेषज्ञांनीही प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली तसेच रत्नागिरी, चिपळूण आदी शहरांतून सुमारे २५ प्रशिक्षणार्थींनी या शिबिराचा लाभ घेतला.

दोन दिवसाच्या अभ्यासक्रमात क्लिनिकल ॲनाटॉमीवर व्याख्याने व सोबत शवविच्छेदनाची प्रात्यक्षिके आणि 'क्लिनिकल केस प्रेझेंटेशन' यांचा उत्तम मेळ साधण्यात आला होता. शेवटी प्रशिक्षकांनी ऑपरेशन थिएटरमध्ये प्रशिक्षणार्थींसमवेत चर्चा करीत या केसीसवरती प्रत्यक्ष शस्त्रक्रिया केल्या.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सकाळी ८.३० वाजल्यापासूनच 'Clinical and surgical anatomy of the hand' या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानमालिकेत हाताच्या शस्त्रक्रियेतील सुधारित तंत्राविषयीची माहिती देण्यात आली आणि त्यानंतर 'Soft-embalmed cadavers' म्हणजे विशेष तंत्रज्ञानाने जतन केलेल्या मृतदेहांवर प्रात्यक्षिक करण्यात आले. मृतदेहाचे जतन करण्याच्या या एकमेव पद्धतीमुळे सहभागी विद्यार्थ्यांना शारीरिक रचना आणि शस्त्रक्रियेतील तंत्रे उत्तम प्रकारे समजून घेता आली. हातातील काही विशिष्ट रचना उदा. flexor आणि extensor tendons, carpal tunnel decompression surgery, (बोटांना मुंग्या येणे, वेदना इ. त्रास





*क्लिनिकल ॲनाटोमीवर व्याख्याने व सोबत शवविच्छेदनाची प्रात्यक्षिके आणि 'क्लिनिकल केस प्रेझेंटेशन' यांचा उत्तम मेळ*



*डावीकडून डॉ. अपूर्व दुबे (ऑर्थो. रेसिडेन्स), डॉ. दीपेश पाटील (ऑर्थो. रेसिडेन्स), डॉ. ओंकार सुदामे (असिस्टन्ट प्रोफेसर), डॉक्टर रघुनंदन कानविंदे (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. नेताजी पाटील (रेडिओलॉजिस्ट), डॉ. प्रशांत मूल्या (प्रोफेसर ॲनॉटॉमी), डॉ. सावता इंगळे (ऑर्थो. रेसिडेन्स), डॉ. निलेश आंबेकर (ऑर्थो. रेसिडेन्स)*

कमी करण्यासाठी नसांवरील ताण कमी करणारी शस्त्रक्रिया) local flaps (अन्य ठिकाणची त्वचा पुनर्स्थापित करून बोटांचे छेदन टाळणे) यासाठीच्या शस्त्रक्रियांची पद्धती समजावून देण्यात आली. मध्यंतरी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाविषयी एक सादरीकरणही दाखविण्यात आले.

सायंकाळच्या सत्रात, दुसऱ्या दिवशी ज्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करावयाच्या होत्या; त्यांच्याविषयी चर्चा आणि शस्त्रक्रियेपूर्वीचे मूल्यमापन करण्यात आले. सहभागींना या चर्चासत्राचा उपयोग क्लिनिकल निष्कर्ष कसे काढावेत, निर्णय कसे घ्यावेत, दुसऱ्या दिवशीच्या शस्त्रक्रियेची पद्धतशीर आखणी कशी करावी यासाठी अत्यंत मोलाचा ठरला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८.०० वाजल्यापासून शस्त्रक्रिया कक्षात निष्णात प्रशिक्षकांनी केलेल्या हातावरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया सहभागींना पाहता आल्या. त्यामध्ये 'Releasing a triggering finger' -आखडलेल्या बोटाच्या हालचाली पूर्ववत करणे, Carpal tunnel decompression surgery - बोटांना मुंग्या येणे, वेदना इ. त्रास कमी करण्यासाठी नसांवरील ताण



*रुग्णांसमवेत बसलेले डावीकडून पाचवे डॉ. ओंकार सुदामे, डॉक्टर रघुनंदन कानविंदे आणि डॉ. प्रशांत मुल्या; पाठीमागे ऑर्थोपेडिक आणि ॲनेस्थेटिक रेसिडेंन्ट्स*

कमी करणारी शस्त्रक्रिया, हातावरील रोगग्रस्त गाठी काढणे, अस्थिभंग झालेल्या बोटाला सरळ करणे, एकाच हाताचे मनगट आणि बोटे यांना झालेल्या अस्थिभंगावर शस्त्रक्रिया करणे अशा विविध प्रकारांचा समावेश होता. काही प्रशिक्षणार्थींना शस्त्रक्रिया कक्षात उभे राहून अगदी जवळून त्या पाहता आल्या. शिवाय सर्वांसाठी बाजूच्या कक्षात मोठ्या LED screen वर त्या पाहण्याची व्यवस्था केलेली होती.

कार्यशाळेच्या अखेरीला सर्व प्रशिक्षणार्थींना "MMC credit points" सह यशस्वी सहभागाविषयीचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सैद्धांतिक व्याख्याने, रुग्ण चिकित्सा आणि मृतदेहावरील प्रात्यक्षिके यांचा सुरेख मेळ साधलेली ही कार्यशाळा एक जोमदार शैक्षणिक अनुभव ठरला. डॉ. कानविंदे यांचे कुशल मार्गदर्शन, सर्व प्रशिक्षकवृंदाचे एकत्रित प्रयत्न यामुळे ही कार्यशाळा 'हाताच्या शस्त्रक्रिया' या विषयावर उत्तम शैक्षणिक मानदंड प्रस्थापित करू शकली आहे. प्रशिक्षणार्थींचा प्रतिसाद उत्तम होता. अशी शिबिरे वारंवार व्हावीत अशी एकमुखी मागणी सर्वांनी केली. शस्त्रक्रिया केलेले सर्व रुग्ण आपल्या घरी आनंदाने परतले. शिबिराच्या यशस्वितेत रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी यांचे सहकार्य अतिशय मोलाचे ठरले.



*रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी यांच्यासमवेत प्रशिक्षक*

## वालावलकर रुग्णालयात हृदय–शस्त्रक्रिया



*डॉ. राजीव गोडबोले आपले सहकारी आणि शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णासमवेत*

वालावलकर रुग्णालय सावर्डे येथे दि. २७ ते २९ डिसेंबर रोजी हृदय–शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. डॉ. राजीव गोडबोले (कार्डिओथोरॅसिक सर्जन) हे आपल्या चमूसह या शिबिरासाठी उपस्थित होते. त्यांच्यासह डॉ. अभिषेक पोतनीस (कार्डिओथोरॅसिक सर्जन), डॉ. सचिन वैष्णव (कार्डियाक अनेस्थेटिस्ट), श्री. सुरेश काळे (परफ्युजिनस्ट), ऑपरेशन थिएटर सिस्टर सुषमा गुरव, आय. सी.यू. सिस्टर कविता कदम, समीक्षा कळंबे, आय.सी.यू. ब्रदर विकास म्हसकर इत्यादी सहभागी झालेले होते.

ह्या शस्त्रक्रिया शिबिरात ४ बायपास शस्त्रक्रिया, १ हृदयाची झडप बदलण्याची शस्त्रक्रिया व १ थोरॅकॉटॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ. प्रणव श्यामराज (वालावलकर रुग्णालयांचे हृद्रोग तज्ज्ञ) यांनी ह्या सर्व रुग्णांच्या ॲन्जिओग्राफी केल्या होत्या. त्यामध्ये ह्या रुग्णांच्या हृदयाच्या तीनही रक्तवाहिन्यांमध्ये गुठळ्या आढळून आलेल्या होत्या. अशा रुग्णांमध्ये ॲन्जिओप्लास्टीचा उपयोग होत नाही. अशा वेळी बायपास शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय असतो. म्हणून ४ रुग्णांवर वालावलकर रुग्णालयात बायपास शस्त्रक्रिया करण्यात आल्या. एका रुग्णाच्या हृदयाची झडप व्यवस्थित उघड–झाप करत नव्हती, तिला सूज आली होती. या रुग्णाची झडप काढून कृत्रिम झडप बसविण्यात आली.

सहाव्या रुग्णाच्या छातीवरती झाड पडलेले होते. त्याच्या छातीला मार लागलेला होता. रुग्णाने १० ते १५ दिवस घरीच घरगुती उपचार केले. परंतु १५ दिवसानंतर त्याच्या छातीत दुखायला लागले, दम लागू लागला, ताप येऊ लागला, म्हणून रुग्णाला वालावलकर रुग्णालयात ॲडमिट करण्यात आले. एक्स रे, सोनोग्राफी, सिटी स्कॅन केल्यानंतर असे लक्षात आले की, रुग्णाच्या छातीत पू झालेला आहे आणि त्यामुळे फुप्फुसाला व हृदयाला इजा झाली आहे. फुप्फुस आकुंचन पावले होते व त्यामुळे संसर्ग हृदयापर्यंत पोचला होता. ह्या रुग्णाची थोराकोटॉमी शस्त्रक्रिया करून हृदय व फुप्फुसाच्या बाजूला जमलेला सर्व पू काढण्यात आला.

वरील सर्व शस्त्रक्रिया 'महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने'अंतर्गत मोफत करण्यात आल्या. सर्व रुग्ण व्याधिमुक्त होऊन घरी गेले. जाताना सर्व रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी डॉ. गोडबोले व त्यांच्या टीमचे व वालावलकर रुग्णालयाचे आभार मानले.

## श्रवणक्षमता गमावलेल्या महिलेला दिलासा

रत्नागिरी येथील एका ३५ वर्षीय महिलेला वर्षभरापासून कमी ऐकू येण्याचा त्रास होत होता. त्यासाठी तिने बऱ्याच ठिकाणी उपचार घेतले पण काही फरक पडला नाही. शेवटी ती वालावलकर हॉस्पिटलमध्ये आली. 'कान, नाक, घसा' विभागातील डॉक्टर राजीव केणी आणि डॉक्टर प्रतीक शहाणे यांनी तिची कानाची तपासणी केल्यावर असे निदर्शनास आले की ऐकू न येण्याची जी कारणे आहेत उदा. कानाचा पडदा फाटणे, कानाच्या हाडांमध्ये रोग असणे किंवा वयोमानानुसार नस कमजोर होणे; यापैकी एकही कारण तिच्या बाबतीत नव्हते. तेव्हा डॉक्टरांनी तिची 'ऑडिओमेट्री' (कानाच्या मशीनने तपासणी) आणि 'इम्पिडन्स' या दोन टेस्ट केल्या व यावरून असे कळले की कानाच्या आतील सूक्ष्म हाडे फिक्स झाल्यामुळे तिला ऐकायला येत नाही. यावर उपाय म्हणून डॉक्टरांनी तिला ऑपरेशनचा सल्ला दिला.

'आपल्याला ऐकू येणार' या आनंदाच्या बातमीने महिलेने लगेच ऑपरेशन करण्याला संमती दिली. डॉक्टर राजीव केणी आणि डॉक्टर प्रतीक शहाणे या 'इ. एन. टी.' सर्जन्सनी अतिशय कुशलतेने कानातील सूक्ष्म हाडाचे मायक्रोस्कोपिक ऑपरेशन यशस्विरीत्या केले. ऑपरेशननंतर ऐकू यायला लागल्यामुळे तिच्या चेहऱ्यावर हास्य व समाधान फुलले. अतिशय अवघड असे ऑपरेशन यशस्विरीत्या केल्याबद्दल डॉक्टर राजीव केणी व डॉक्टर प्रतीक शहाणे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




*डॉ. राजीव केणी व डॉ. प्रतीक शहाणे आपले सहकारी आणि यशस्वी शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णासमवेत*

# वालावलकर रुग्णालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा २०२५



प्रसिद्ध अभिनेते श्री. श्रेयस तळपदे दीप प्रज्वलन करताना



श्री. श्रेयस तळपदे आपले विचार व्यक्त करताना

भक्तश्रेष्ठ कमलकरपंत वालावलकर रुग्णालय, सावर्डे येथे नुकताच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहत साजरा करण्यात आला. डेरवण येथील समर्थ नर्सिंग कॉलेज व भ.क.ल.वालावलकर रुग्णालय येथील वार्षिक स्नेहसंम्मेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ दि. २० जानेवारी २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला. प्रसिद्ध अभिनेते श्री. श्रेयस तळपदे हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित होते.

अभिनेते श्री. श्रेयस तळपदे यांनी वालावलकर रुग्णालय मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, फिजिओथेरपी कॉलेज, स्पोर्ट्स अकॅडेमी, तसेच न्युक्लिअर मेडिसीन, लिनियर ॲक्सीलिरेटर विभागाला भेट दिली. वार्षिक स्नेहसंमेलनांची सुरुवात श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती महाराजांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

१५ वर्षांपूर्वीदेखील अभिनेते श्री. श्रेयस तळपदे हे सोहळ्यासाठी उपस्थित होते. या बाबतीत त्यांनी त्यांच्या मनोगतात म्हटले की श्रीक्षेत्र डेरवण हे विविध प्रकारे विकसित झालेले आहे. जरी सर्व काही बदलले असले तरी येथील श्रीक्षेत्राचा हेतू बदलला नाही. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की कोणतेही काम करा पण उत्कृष्टपणे करा. हे सांगताना त्यांनी आपल्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगही सांगितला. रुग्णालयांकडून देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट वैद्यकीय सोयी-सुविधा, येथील डॉक्टर्स, नर्सेस आणि इतर सर्वांचे भरभरून कौतुक केले.

संस्थेच्या समाजकार्यात कुठल्याही प्रकारचे योगदान देण्यास आपण केव्हाही तयार असल्याचे सांगायला ते विसरले नाही.

ह्या कार्यक्रमात संस्थेचे हितचिंतक आणि रुग्णांना योग्य मार्गदर्शन करून वालावलकर रुग्णालयात उपचारांसाठी मार्ग दाखविणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांचा आणि समाजसेवक श्री. संजय महादेव शिंदे (उपविभाग प्रमुख) - संगमेश्वर , श्री. मनोहर चव्हाण - अध्यक्ष, तंटामुक्त समिती (मार्गताम्हणे), श्री. सुरेश मारुती पवार - अध्यक्ष,तंटामुक्त समिती (चिंचघर), श्री. संदीप देसाई - सामाजिक कार्यकर्ते (जालगांव), श्री. किरण पावसे-सामाजिक कार्यकर्ते (बुरोंडी), श्री. कासम सालेह-सामाजिक कार्यकर्ते (श्रृंगारतळी), श्री. उदय खरे - विश्वस्त, मैत्री ग्रुप (पोलादपूर), श्रीमती दीपिका हळदणकर - सहाय्यक अधिसेविका (कळंबणी), श्रीमती सेजल मळेकर - परिसेविका (दापोली), श्रीमती आकांक्षा आजलेकर - अधिपरिचारिका, ग्रामीण रुग्णालय (मंडणगड), श्री. कमलेश कामतेकर - आरोग्य सेवक (देवरुख), श्री. सनी दुदुस्कर - आरोग्य सेवक (पोलादपूर), सौ. रोहिणी पांडुरंग राठोड - आरोग्य सेविका (वालोपे), श्री. अमोल साळवी - तालुका समूह संघटक (चिपळूण), सौ. रंजना महाडीक - आशा सेविका (खाडटापाळी) आदी सर्वांचा सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनादेखील त्यांच्या शैक्षणिक यशासाठी गौरविण्यात आले. विविध प्रकारच्या सांस्कृतिक कलागुणांचे सादरीकरण विद्यार्थ्यांकडून केले गेले. सोहळ्याच्या शेवटी कलागुणांचे कौतुक करून कार्यक्रमाची रुचकर स्नेहभोजनाने सांगता झाली.

## श्रवण यंत्राचे मोफत वाटप

वालावलकर रुग्णालयाच्या 'कान-नाक-घसा' विभागात श्रवणयंत्राचे मोफत वाटप करण्यात आले. या शिबिरामध्ये दि. १७ ते २० डिसेंबर या काळात ७५ रुग्णांची नावनोंदणी व कानांची तपासणी करण्यात आली आणि दि. २१ डिसेंबर रोजी श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. हा अभिनव उपक्रम देणगीदारांच्या देणगीतून करण्यात आला. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल वृद्ध स्त्री-पुरुषांना ऐकू येऊ लागले व त्यांच्या चेहेऱ्यावर समाधान उमटले. या शिबिराच्या उत्तम नियोजनासाठी 'कान-नाक-घसा' विभागाचे डॉ. प्रतीक शहाणे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

(छायाचित्र पान ६ वर)

# कु. नीलांबरी ठाकूर ‘चतुरंग’च्या ‘सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्कारा’ने सन्मानित



श्री. दीपक करंजीकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना कु. नीलांबरी ठाकूर



सत्काराला उत्तर देताना कु. नीलांबरी ठाकूर

कोकणातील शाळांमध्ये प्रतिष्ठेचा समजला जाणारा ‘चतुरंग प्रतिष्ठान’चा ‘सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्कार’ श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थिनी कु. नीलांबरी रवींद्रनाथ ठाकूर (इ.१०वी) हिला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, लेखक आणि अभिनेते श्री. दीपक करंजीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, रोख रु. १००० आणि ५०० रुपये रकमेची पुस्तके असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अभ्यासासोबतच खेळ, कला, वक्तृत्व, वर्तणूक अशा सर्व गोष्टींमध्ये बहुगुणी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांची निवड गट मुलाखतीद्वारे केली जाते. जिल्ह्यातील ५४ शाळांतील २०३ विद्यार्थ्यांमधून ३४ विद्यार्थ्यांची निवड यंदा या पुरस्कारासाठी केली गेली आणि रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी चिपळूणमधील ‘इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र’ येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. प्रसाद देवधर, डॉ. मिलिंद गोखले आणि सौ. रमा करमरकर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या घेतलेल्या मुलाखतीमध्ये SVJCT शाळेच्या विद्यार्थ्यांचे, प्रशालेचे उल्लेखनीय शाळा म्हणून डॉ. प्रसाद देवधर यांनी विशेष कौतुक केले. पुरस्कार निवडीच्या निकषांवरून शाळेतील एकाच विद्यार्थ्याची निवड या पुरस्कारासाठी होऊ शकते. पण या शाळेतील पाचही विद्यार्थी ‘सर्वोत्तम’ आहेत असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

‘सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्कार’प्राप्त विद्यार्थिनी कु. नीलांबरी ठाकूर ही निबंध लेखन, रामरक्षा, मनाचे श्लोक पठण, वक्तृत्व स्पर्धा यामध्ये तालुका स्तरावर प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे. त्याचबरोबर गायनाच्या प्रारंभिक ते सुबोध या परीक्षांमध्ये राज्यस्तरावरती प्रथम श्रेणीने ती उत्तीर्ण झाली आहे. जर्मन व संस्कृत भाषांचाही तिचा अभ्यास आहे. नीलांबरी ही मुलगी अत्यंत साधी, नम्र त्याचबरोबर सर्वांशी आपुलकीने वागणारी आहे. वृत्तपत्रासोबतच सत्यजित रे यांच्या कथा, कॉसमॉस, मृत्युंजय अशी पुस्तके वाचण्याची आवड असणाऱ्या नीलांबरीचे आदर्श आहेत नेल्सन मंडेला आणि पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी. विज्ञान क्षेत्रात आवड असणाऱ्या नीलांबरीला ‘प्रॉम्प्ट इंजिनीयर’ व्हायचे आहे.

सत्काराला उत्तर देताना कु. नीलांबरी ठाकूर म्हणाली, ‘‘चतुरंग प्रतिष्ठानचे मी आभार मानू इच्छिते कारण खेड्यापाड्यातील, दुर्गम भागातील आम्हा मुलांना त्यांनी गट मुलाखतीद्वारे आमची मते, विचार व्यक्त करण्याची संधी दिली; तसेच मुलाखत अगदी खेळीमेळीच्या वातावरणात घेतली. त्यामुळे आम्ही तणावमुक्त संवाद साधू शकलो. माझ्या शाळेचेही आभार व्यक्त करते; कारण मुलाखतीच्या तयारीपासून ते आजच्या सन्मान सोहळ्यापर्यंतच्या संपूर्ण प्रवासात शाळेतील शिक्षकांनी आम्हाला ‘तुम्ही करू शकता, स्वतःवर विश्वास ठेवा!’ असे प्रोत्साहित केले आणि आम्ही सर्व सहध्यायी ही मुलाखत खूप चांगल्या प्रकारे पार पाडू शकलो. तसेच आई-वडील आणि परिवाराचे आभार मानते; कारण लहानपणापासूनच त्यांनी केवळ अभ्यासाला महत्त्व न देता माझ्यातील कलागुणांना प्रोत्साहन दिले.’’ तिच्या या यशाबद्दल शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव, मुख्याध्यापिका श्रीमती प्रज्ञा पारकर, शिक्षकवर्ग आदींनी अभिनंदन केले.

*श्रवणयंत्राचे वाटप करताना डॉ. शहाणे आणि सहकारी* *(वृत्त पान ५ वर)*



# रोबोटिक्स रोबोकॉन स्पर्धा २०२५



निवृत्त एअर मार्शल श्री. हेमंत भागवत यांच्या हस्ते "Dry - Wet Waste Segregation Dustbin ' या रोबोटसाठी पारितोषिक स्वीकारताना इ. ९ वीचे विद्यार्थी



ओला-सुका कचरा विलगीकरण रोबोटसाठी पुरस्कार प्राप्त विद्यार्थी- डावीकडून अर्जुन राजेशिर्के, ओम पवार, राजरत्न पवार, पार्थ सावंत, समर्थ नरोटे व मार्गदर्शक शिक्षक श्री. उज्वल सुर्वे

रत्नागिरी जिल्ह्यातील पहिल्या आंतरशालेय रोबोटिक्स रोबोकॉन स्पर्धेचे आयोजन ‘स्काई रोबोटिक्स’, पुणे यांच्यामार्फत चिपळूण येथे नुकतेच करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानावर आधारित कल्पनाशक्तीचा वापर करून विविध प्रकारचे रोबोट तयार करून त्यांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाविषयी फार कुतूहल पाहायला मिळते. याच कुतूहलातून सादर झालेली विद्यार्थ्यांची नवकल्पना आणि तांत्रिक कौशल्य पाहून शिक्षक व पालक वर्गाने विशेष कौतुक केले.’

या स्पर्धेमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १६ शाळांमधील १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ५० हुन अधिक रोबोट प्रकल्प सादर केले. SVJCT इंग्रजी माध्यम शाळेतून ४ गटातून एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक गटाने आपल्या रोबोटची तांत्रिक जुळवणी परीक्षकांसमोर शून्यातून सुरू करून, पूर्ण झाल्यावर प्रकल्पाचे कार्य प्रदर्शन करायचे होते.

SVJCT शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'Dry-Wet Waste Segregation Dustbin' या ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करणाऱ्या प्रकल्पाला पारितोषिकाने गौरवण्यात आले. तसेच Remote Air Defense System, Obstacle Avoiding Robot, Wall Following Robot असे इतर तीन प्रकल्प SVJCT च्या विद्यार्थ्यांनी सादर केले व उपस्थितांचे लक्ष वेधले.

सहभागी विद्यार्थ्यांनी अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्याचे सांगत समाधान व्यक्त केले. या स्पर्धेने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला आणि तांत्रिक कौशल्यांना प्रोत्साहन दिले. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या २१व्या शतकातील कौशल्याच्या विकासासाठी प्रेरित करेल तसेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.



Wall Following Robot चे प्रात्यक्षिक सादर करताना इ. ९ वीच्या विद्यार्थिनी



'Remote Air Defense System Robot ' ची कार्यप्रणाली सादर करताना इ. ९ वीचे विद्यार्थी



"Obstacle Avoiding Robot' चे कार्यप्रदर्शन करताना इ. ८ वीचे विद्यार्थी

# 'अस्मिता - खेलो इंडिया' फुटबॉल लीगची सांगता

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. १७ ते १९ जानेवारी या कालावधीत १३ वर्षांखालील मुलींसाठी जिल्हास्तरीय 'अस्मिता - खेलो इंडिया' फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विजयी संघाना स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियातर्फे रोख पारितोषिकेही देण्यात आली. या स्पर्धेमध्ये 'डेरवण फुटबॉल क्लब' संघाने लीगचे विजेतेपद मिळवले. तसेच 'सेंट थॉमस फुटबॉल ॲकॅडमी' संघ उपविजेता ठरला व 'सेक्रेट हार्ट कॉन्व्हेन्ट फुटबॉल क्लब' या संघाला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी सुरू झालेली ही स्पर्धा दोन टप्प्यांत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 'दापोली फुटबॉल क्लब', 'लांजा फुटबॉल क्लब' व 'मेरी माता फुटबॉल ॲकॅडमी' हे संघही सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याच्या वेळी प्रमुख पाहुण्या डॉ. अमृता बलकवडे - प्रतिनिधी, स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांनी खेळाडू मुलींचे कौतुक केले. आपल्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले आणि स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया नेहमीच अशा स्पर्धांकरिता सहकार्य करत राहील अशी ग्वाही दिली.

बक्षीस वितरण सोहळ्यासाठी वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे धनराज मोरे, रत्नागिरी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद परांजपे, उपाध्यक्ष विनोद म्हस्के, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, नितीन वाघधरे, कृष्णा गावडे, अजित धावडे आदी मान्यवर उपस्थित होते. अशा फुटबॉल स्पर्धेमुळे रत्नागिरी जिल्ह्यात दर्जेदार खेळाडू घडवण्यासाठी मदत होईल, असे मत धनराज मोरे यांनी व्यक्त केले. खेळाडूंच्या प्रगतीसाठी कायमच प्रयत्नशील असणाऱ्या एसव्हीजेसीटीच्या दर्जेदार मैदानामुळे स्पर्धा रंगतदार झाल्या आणि लहान मुलींना एका उत्तम स्पर्धेत खेळण्याचा अनुभव मिळाला, असे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.



*विजेत्या डेरवण एफसी संघासोबत उजवीकडून - विनायक पवार, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, धनराज मोरे, डॉ. अमृता बलकवडे अध्यक्ष प्रसाद परांजपे, बी.के.एल वालावलकर फ़िजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, रत्नागिरी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष विनोद म्हस्के.*




*उपविजेत्या 'सेंट थॉमस फुटबॉल ॲकॅडमी'संघासोबत उजवीकडून - विनायक पवार, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, धनराज मोरे, डॉ. अमृता बलकवडे, बी.के.एल वालावलकर फ़िजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्रसाद परांजपे, रत्नागिरी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष विनोद म्हस्के.*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.

Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०